## दिनांक : ०७.०२.२०२३ रोजी पुनर्निर्माण योजने बाबत झालेल्या सभेच्या कामकाजाचा वृतांत

पुनर्निर्माण योजनेबाबत पुढील निर्णय घेण्याच्या दृष्टीने मंगळवार, दिनांक ०७.०२.२०२३ रोजी रात्रौ ८.३० वाजता संस्थेच्या समाज मंदिरामध्ये पंच समितीची बैठक बोलाविण्यात आली होती. सदरच्या बैठकीमध्ये एकुण ७ सदस्य उपस्थित होते. या सभेमध्ये व्यापक चर्चे अंती पुढील निर्णय व कामकाज एकमताने घेण्यात / करण्यात आले.

१) शॉर्ट लिस्ट झालेल्या शेवटच्या ७ विकसकांनी दिनांक ५ व ६ मार्च, २०२३ (रविवार व सोमवार) रोजी दुपारी २ ते ६ / ५ या वेळात संस्थेच्या समाज मंदिरामध्ये संस्थेने त्यांना दिलेली WISH - LIST लक्षात घेऊन त्यांचे त्यांचे पत्रकार नगरच्या पुनर्निर्माण योजने बाबतचे अंतीम AUDIO - VISUAL प्रेझेंटेशन करावे. या करीता प्रत्येक विकसकास साधारण १ तासाची वेळ देण्यात यावी.

२) या बाबत सर्व विकसकांना समान संधी देण्याच्या ऊद्देशाने व या बाबत कोणाचीही तक्रार असु नये या हेतुने सदरच्या प्रेझेंटेशनच्या विकसकांची क्रमवारी चिठ्या टाकुन निश्चित करण्यात आली. संस्थेचे या वेळी ऊपस्थित असलेले वॉचमन श्री यादव यांना सदरच्या चिठ्या काढण्यास सांगण्यात आल्या. त्या प्रमाणे या पुढे नमुद केलेली अंतिम ७ विकसकांची क्रमवारी व त्यांना देण्यात येणारी वेळ ठरविण्यात आली.

१) रविवार दिनांक ०५.०३.२०२३ रोजी दुपारी २ ते ३: कोहिनुर.
२) रविवार दिनांक ०५.०३.२०२३ रोजी दुपारी ३ ते ४: शुभम LLP (न्याती).
३) रविवार दिनांक ०५.०३.२०२३ रोजी दुपारी ४ ते ५: जोशी - हुबळीकर.
४) रविवार दिनांक ०५.०३.२०२३ रोजी दुपारी ५ ते ६: रावेतकर.

१) सोमवार दिनांक ०६.०३.२०२३ रोजी दुपारी २ ते ३: मॅजेस्टिक.
२) सोमवार दिनांक ०६.०३.२०२३ रोजी दुपारी ३ ते ४: प्रिस्टीन हाय -स्पॉट.
३) सोमवार दिनांक ०६.०३.२०२३ रोजी दुपारी ४ ते ५: व्यंकटेश बिल्डकॉन.

३) या सभेमध्ये सर्व उपस्थित सदस्यांनी केलेल्या चर्चेअंती या सभेमध्ये असेही ठरविण्यात आले की दिनांक ५ व ६ मार्च, २०२३ रोजी वर ऊल्लेखलेल्या प्रेझेंटेशन करता संस्थे मध्ये असलेल्या सर्व प्रवर्गांना (FLAT AREA HOLDING WISE) प्रतिनिधित्व मिळेल अश्या दृष्टीने एकूण 10 सदस्यांना ऊपस्थित रहाण्या करीता व त्यांचे त्या बाबतचे विचार जाणुन घेण्या करीता निमंत्रित करावे.

सदर 10 सभासद कोण हे वरील निकषांच्या आधारावर सचिवांनी ठरवुन त्यांना निमंत्रण द्यावे असे पुढे ठरविण्यात आले.

वरील कामकाज पुर्ण झाल्या नंतर सभा समाप्त झाली.

**अनंत शालिग्राम**
**पंच समिती साठी**